राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्यासाठी सन २०१६-१७ तील मंजूर कामत बदल करणेबाबत .

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांक : क्षेविका-२०१७/प्र.क्र.१६४/का.९
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०५ जानेवारी, २०१८.

वाचा :- १) शासन निर्णय,अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. क्षेविका-२०१६/ प्र.क्र.१३५/१६/ का.९, दि. २८ डिसेंबर, २०१६
२) शासन निर्णय,अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. नाक्षेवि-२०१७/ प्र.क्र.४३/ का.९, दि. ३१ मार्च, २०१७.
३) शासन निर्णय,वित्त विभाग, क्र. संकिर्ण -१०.१७/ प्र.क्र.६४/ अर्थोपाय, दि. २१ सप्टेंबर, २०१७.

शासन शुध्दीपत्रक:-

संदर्भाधीन क्र. १ येथील सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये दि.२८ डिसेंबर,२०१६ रोजीच्या शासन निर्णयासोबत असलेल्या परिशिष्ट "अ " मधील अ.क्र. ३२ येथील मुंबई उपनगर करिता बृहन्मुंबई म.न.पा. येथील मंजूर कामांतील क्र. ०२, ०३, २३, २४, २५, २६, २७, २८, २९, ३१ व ०८ अन्वये राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत अनुदान मंजूर करण्यात आले होते. तथापी, संदर्भाधीन क्र. २ येथील सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये दि.३१ मार्च,२०१७ रोजीच्या शासन निर्णयासोबत असलेल्या परिशिष्ट "अ " मधील अ.क्र.१ येथील मुंबई उपनगर करिता बृहन्मुंबई म.न.पा. (बोरिवली) येथील मंजूर कामांतील क्र. ०३ खालील प्रमाणे दर्शविलेल्या तक्त्यातील कामांना मान्यता देण्यात आली होती.

अ.क्र.	जिल्हा	महानगरपालिका /नगरपालिका / नगरपरिषद	विकासकामे	मंजूर निधी (रु. लाखात)
३२	**मुंबई उपनगर**	बृहन्मुंबई म.न.पा.	बोरीवली खुशाली निवास एस व्ही रोड रामबाग लेन-लादीकरण व गटार काम	५.००
			बोरीवली गंगा जमुना चाळ पोईसर गावदेवी रोड-लादीकरण व गटार काम	५.००
			आदम दानीया चाळ पोईसर गावदेवी रोड लादीकरण व गटार काम	५.००
			लतिफ दमामिया चाळ पोईसर गावदेवी रोड लादीकरण व गटार काम	५.००
			वलामियॉ चाळ पोईसर गावदेवी रोड लादीकरण व गटार काम	५.००
			गंगा जमुना चाळ पोईसर गावदेवी रोड लादीकरण व गटार काम	१०.००

			सत्तार चाळ पोईसर अँथनी रोड लादीकरण व गटार काम	५.००
			सुलेमान चाळ पोईसर अँथनी रोड लादीकरण व गटार काम	५.००
			नुर मोहम्मद चाळ लेडी फातिमा रोड लादीकरण व गटार काम	५.००
			रोशन चाळ, बोरिवली पूर्व लादीकरण व गटार काम	५.००
			बोरीवली सत्तार पोईसर अँथनी रोड-लादीकरण व गटार काम	५.००
१	**मुंबई उपनगर**	बृहन्मुंबई म.न.पा. (बोरिवली)	पोईसर, बोरीवली पश्चिम येथील दुर्गा कमिटी मस्जिदचे नुतनीकरण	१०.००
			(एकूण अक्षरी रुपये पंच्चात्तर लक्ष फक्त)	**७५.००**

याऐवजी

मुंबई उपनगर जिल्ह्यातील बृहन्मुंबई म.न.पा. येथील खालीलप्रमाणे दिलेल्या कामांमध्ये पुढील सुधारणा करण्यासमान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामे पुढील प्रमाणे वाचण्यात यावीत.

अ. क्र.	जिल्हा	महानगरपालिका / नगरपालिका/ नगरपरिषद	विकासकामे	मंजूर निधी (रु. लाखात)
१	**मुंबई उपनगर**	बृहन्मुंबई म.न.पा.	गोराई गाव, गोराई कोळीवाडा बीचला जाणारा रस्त्याचे कॉन्क्रीटीकरण करणे	२०.००
२			लहान्या स्टोअर्स ते सोनावणे हाऊस रस्त्याचे कॉन्क्रीटीकरण करणे	१०.००
३			मनोरी गाव, गोवारी हाऊा ते केणी हाऊस रस्त्याचे कॉन्क्रीटीकरण करणे	१०.००
४			मदरसा ई कादरिया अल सुन्नत वल जमात, राजेंद्र नगर बोरीवली (पूर्व) सभामंडप बांधणे	१५.००
५			रीजर्द हाऊस ते भीकर धानगोइया हाऊस रस्त्याचे कॉन्क्रीटीकरण करणे	२०.००
			(एकूण अक्षरी रुपये पंच्चात्तर लक्ष फक्त)	**७५.००**

२. वित्त विभागाने दि. २१ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये अर्खचित निधी संदर्भात दिलेल्या निदेशानुसार सन २०१६-१७ मध्ये वितरित केलेला निधी दिनांक०६जून, २००८च्या शासन निर्णयानुसार दि.३१मार्च, २०१८ पर्यंत खर्च करता येईल असे नमूद केले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे उपरोक्त निधी अखर्चित आहे या अटी व शर्तीच्या अधीन राहून, उपरोक्त संदर्भ क्र. १ मधील

अ. क्र. ३२ तसेच संदर्भ क्र. २ मधील अ. क्र. १ चे विकासकामांना सन २०१६-१७ मधील अनुदानातून निधी वितरित करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. या योजनेंतर्गत होणारा खर्च " मागणी क्र. झेडई-१, मुख्यलेखाशिर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाजकल्याण २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०७) अल्पसंख्याक सकेंद्रित क्षेत्रातील क्षेत्र विकास कार्यक्रमाकरिता सहायक अनुदान (२२३५-ए-१३१) ३१ सहायक अनुदान" या लेखाशिर्षाखाली संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयातील मंजूर विकासकामांना तसेच संदर्भ क्रमांक२ येथील शासन निर्णयातील मंजूर विकासकामाला सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना वितरित करण्यात आलेल्या अनुदानातून **एकूण रु.७५,००,०००/-(एकूण अक्षरी रुपये पंच्चात्तर लक्ष फक्त)** भागविण्यात यावा.

४. हा शासन शुध्दीपत्रक, वित्त विभागाच्या क्र. संकिर्ण -१०.१७/ प्र.क्र.६४/ अर्थोपाय, दि. २१ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयातील व त्यासोबतच्या परिशिष्टामधील मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहेत.

हा शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०१०५१७२७३०७६१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dinesh M.
Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf,
2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2018.01.05 17:31:29 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
४. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
५. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
६. महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा) , मुंबई / नागपूर,
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
९. संबंधित विभागीय आयुक्त,
१०.आयुक्त, नगरपालिका प्रशासन, मुंबई,
११.संबंधित जिल्हाधिकारी,
१२.आयुक्त, संबंधित महानगरपालिका,
१३.मुख्याधिकारी, संबंधित नगरपालिका,
१४.मा.मंत्री / मा.राज्यमंत्री (अल्पसंख्याक विकास) यांचे खाजगी सचिव,
१५.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी),
१७.निवडनस्ती (का-९)